लोकमत

# सांगलीतील पेपरफुटीची आजपासून चौकशी

## शिवाजी विद्यापीठात प्रमाद समितीची बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बी. एस्सी. भाग तीनच्या सहाव्या सत्रातील फिजिकल केमिस्ट्री विषयाच्या प्रश्नपत्रिकेची (पेपर) वेळेपूर्वी प्रिंट काढण्याचा (पेपरफुटी) प्रकार गेल्या आठवड्यात सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील एका महाविद्यालयात घडला. त्याची चौकशी आज (गुरुवार) पासून शिवाजी विद्यापीठात सुरू होणार आहे.

परीक्षा प्रमाद समितीकडून ही चौकशी केली जाणार आहे. कुंडलमध्ये पेपरफुटीचा प्रकार घडला, तर रेठरे (ता. कऱ्हाड) येथील कृष्णा महाविद्यालयात या पेपरला गैरप्रकार (कॉपी) करताना चार विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या भरारी पथकाला सापडले. पेपरफुटीचा प्रकार घडलेल्या महाविद्यालयातील प्राथमिक चौकशीत शिपाई आणि लॅब अस्टिटंट दोषी आढळले आहेत. त्यांच्यासह प्राचार्य, वरिष्ठ पर्यवेक्षक, एसआरपीडी कक्षांचे समन्वयक आणि रेठरे येथील महाविद्यालयात कॉपी करताना सापडलेल्या चार विद्यार्थ्यांची चौकशी परीक्षा प्रमाद समितीकडून केली जाणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

### प्राथमिक अहवाल विद्यापीठाला सादर

कुंडल येथील महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी पेपर दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज आणि प्राथमिक चौकशीचा अहवाल विद्यापीठाला सादर केला आहे. याविषयीच्या चौकशीनंतर त्यामध्ये दोषी आढळणाऱ्यांवर विद्यापीठ नियमानुसार कारवाई केली आहे. विद्यापीठाने बुधवारी घेतलेल्या परीक्षेदरम्यान एक कॉपी केस भरारी पथकाला सापडली असल्याचे त्यांनी सांगितले.

28 JUL 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण संतुलन साधत ऊर्जेची गरज भागवा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य महोत्सव कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अन्न, वस्त्र, निवारा या सोबतीने वीज ही चौथी तर संदेशवहनाचे बँडविथ ही पाचवी गरज बनते आहे. म्हणूनच पर्यावरण संतुलन साधून ऊर्जेची गरज भागवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अपारंपरिक ऊर्जेचा प्रवास गतिमानतेने सुरू आहे ही बाब कौतुकास्पद आहे. आजादी का अमृतमहोत्सवांतर्गत उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य महोत्सवामध्ये ते बोलत होते.

भारतरत्न डॉ. एस. विश्वेश्वरय्या मेमोरियल हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती आमदार जयश्री जाधव, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य अभियंता परेश भागवत, अधीक्षक अभियंता मनोज विश्वासे, एनटीपीसीचे डी. सुरेश, जी. के. विवेक यांची होती. अधीक्षक अभियंता अंकुर कावळे यांनी प्रास्ताविक केले.

कुलगुरू शिर्के म्हणाले, ऊर्जा महोत्सवाच्या माध्यमातून ऊर्जा क्षेत्राचे सिंहावलोकन करीत असताना पुढील २५ वर्षांचे नियोजन केले जाते आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे २०३० पर्यंतचे ५०० गिगावॅट उद्दिष्ट गाठण्यासाठी एकत्रितपणे काम करूया. दरम्यान, त्यांनी महापूर व कोरोना काळातील सुरळीत विजेसाठी केलेल्या कामाबद्दल वीज कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

राहुल रेखावार म्हणाले, विजेच्या अविरतपणावर अर्थचक्राचा व नागरिकांचा सर्वांगीण विकास अवलंबून आहे. वीज आता मानवतेची गरज झाली आहे. पुढील काळात विजेचा समावेश मानवी हक्कात होईल, अशी स्थिती आहे. संजयसिंह चव्हाण म्हणाले, प्रकाश अर्थात ऊर्जेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. एडिसनने लावलेला विजेचा शोध ही सर्वात मोठी क्रांती आहे.

दरम्यान, राज्यात ऊर्जा मंत्रालय, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती व इतर भागिदार यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य शासनाच्या दि. २५ ते ३० जुलै या कालावधीत हा महोत्सव साजरा करण्यात येतो आहे. महावितरणने विविध योजनांची, ग्राहकाधिकार व कोल्हापूर महावितरणच्या महापूर कामाची माहिती देणाऱ्या डिजिटल फलकांची गॅलरी तयार केली होती. त्या गॅलरीचे प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता मुकुंद आंबी यांनी केले. यावेळी पन्हाळा नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा रूपालीताई धडेल, सरदार पाटील (सावर्डे), सरदार व्हरांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या 'एनएसएस'चे कार्य आदर्शवत : जयंत किशोर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य समाजाभिमुख आणि आदर्शवत स्वरूपाचे आहे, असे उद्गार केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालयाचे सहायक सचिव जयंत किशोर (आय.ए.एस.) यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्या एनएसएस विभागास किशोर यांनी भेट देऊन योजनेच्या विद्यापीठ आणि महाविद्यालयीन स्तरावरील कामकाजाची सविस्तर माहिती घेतली. त्यानिमित्ताने आयोजित संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.

जयंत किशोर म्हणाले, एनएसएसशी निगडित घटकांसाठी शासकीय स्तरावर आणखी धोरणात्मक योजना आखण्यात येणार आहे. यावेळी त्यांनी स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

अध्यक्षीय मनोगतात प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना ही स्वयंसेवकांच्या तनामनामध्ये रुजलेली असते. त्यातून त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडतो.

यावेळी एनएसएस संचालक अभय जायभाये यांनी प्रास्ताविक केले. योजनेचे सल्लागार डॉ. संजय ठिगळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. पोपटराव माळी यांनी आभार मानले. यावेळी सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांतील ४५० स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.

तत्पूर्वी, जयंत किशोर यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याशी विद्यापीठातील एनएसएसच्या उपक्रमांबाबत चर्चा केली. त्यानंतर विद्यापीठातील व महाविद्यालयातील एनएसएसच्या विभागांना भेटी दिल्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालयाचे सहायक सचिव जयंत किशोर यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अभय जायभाये व डॉ. संजय ठिगळे.

पुढारी

# विद्यापीठाच्या ६६ विषयांच्या परीक्षा पूर्ण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मार्च-एप्रिल २०२२ च्या उन्हाळी सत्रात एकूण ७४१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांपैकी विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षांपैकी काही परीक्षांना दि. १९ जुलै २०२२ पासून एम.सी.क्यू. ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे सुरुवात झाली होती. बुधवार, दि. २७ जुलै रोजी विविध अधिविभागांतील अभ्यासक्रमाच्या ६६ विषयाच्या परीक्षा पार पडल्या. एकूण ५११२० इतक्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके आहेत. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यावर 'गैरप्रकार' म्हणून प्रत्यक्ष नोट करून परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# रसायनशास्त्र कोर्समध्ये ३२ विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात सातदिवसीय 'व्हॅल्यू ॲडेड कोर्स'मध्ये रसायनशास्त्र अधिविभागातील ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमात डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. डी. एस. दगडे, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. डी. एस. भांगे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सकाळ

# अपारंपरिक ऊर्जानिर्मितीचे उद्दिष्ट गाठूया : डॉ. शिर्के

## आजादी का अमृत महोत्सवांतर्गत उपक्रम


डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. २७ : पर्यावरण संतुलन साधून ऊर्जेची गरज भागविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. अपारंपरिक ऊर्जानिर्मितीचे २०३० पर्यंतचे ५०० गिगावॉट उद्दिष्ट गाठण्यासाठी एकत्रितपणे काम करू या, असे आवाहनही त्यांनी केले.

आजादी का अमृत महोत्सवांतर्गत केंद्रीय ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयातर्फे राष्ट्रीयस्तरावर उज्ज्वल भारत- उज्ज्वल भविष्य महोत्सव सुरू आहे. त्याअंतर्गत भारतरत्न डॉ. एस. विश्वेश्वरय्या मेमोरियल हॉल येथे आयोजित उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य महोत्सवात ते बोलत होते. ऊर्जा मंत्रालय, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती व इतर भागीदार यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य शासनातर्फे महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

डॉ. शिर्के म्हणाले, ''अन्न, वस्त्र, निवारा या सोबतीने वीज ही चौथी, तर संदेश वहनाचे बँडविड्थ ही पाचवी गरज बनत आहे. ऊर्जा महोत्सवाच्या माध्यमातून ऊर्जा क्षेत्राचे सिंहावलोकन करत असताना पुढील २०४७ अर्थात २५ वर्षांचे नियोजन केले जाते आहे. त्यादृष्टीने अपारंपरिक ऊर्जेचा प्रवास गतिमानतेने सुरू आहे.''

महापूर व कोरोना काळातील सुरळीत विजेसाठी केलेल्या कामाबद्दल वीज कर्मचाऱ्यांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. जिल्हाधिकारी राहुल रेखावार म्हणाले, ''विजेच्या अविरतपणावर अर्थचक्राचा व नागरिकांचा सर्वांगीण विकास अवलंबून आहे. वीज आता मानवतेची गरज झाली आहे. पुढील काळात विजेचा समावेश मानवी हक्कात होईल, अशी स्थिती आहे. विजेच्या उपलब्धतेवर उद्योग क्षेत्राची घोडदौड, देशाच्या प्रगतीचा आलेख अवलंबून आहे. तेव्हा उद्योगांना अखंडित वीज दिली पाहिजे.''

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण म्हणाले, ''देशातील वीजनिर्मिती प्रकल्प व जल प्रकल्प यांचे देश विकासात मूलभूत योगदान आहे. सामान्य माणसांच्या जीवनात प्रकाश राहील, असे कार्य महावितरणने नेहमी करत राहावे.''

यावेळी आमदार जयश्री जाधव, मुख्य अभियंता परेश भागवत, अधीक्षक अभियंता अंकुर कावळे, अधीक्षक अभियंता मनोज विश्वासे, डी. सुरेश, के. विवेक उपस्थित होते. उपकार्यकारी अभियंता मुकुंद आंबी यांनी आभार मानले.

सकाळ



वारणानगर : वारणा महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या विद्यार्थिनींचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर आदी.

# वारणाचे विद्यार्थी विद्यापीठात अव्वल

**वारणानगर :** गुणवंतांनी गुणवत्तेच्या आधारे भविष्यात उत्तम कामगिरी करावी, असे आवाहन वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांनी येथे केले. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातील कला शाखेतील पाच विद्यार्थिनींनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी डॉ. कोरे बोलत होते. प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी शुभेच्छा दिल्या. समीक्षा दळवी, मनस्वी लोहार, कल्याणी पाटील, स्वाती लोहार यांनी बी.ए. प्रथम वर्षाच्या परीक्षेत सरासरी ८५ टक्के गुण प्राप्त केले. त्यांना प्रत्येकी रुपये दहा हजार आणि प्रमाणपत्र प्राप्त झाले. अंजली गौड हिला एम.ए.च्या पहिल्या वर्षामध्ये सर्वोत्तम ग्रुप प्राप्त केल्याबद्दल १५ हजार रुपये शिष्यवृत्ती आणि प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. अतिश देशमुख यांनी आभार मानले.

28 JUL 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण संतुलन साधून ऊर्जेची गरज भागविणे आवश्यक

## कुलगुरु मा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : मान्यवर उपस्थित

प्रतिनिधी
कोल्हापूर

ऊर्जा महोत्सवाच्या माध्यमातून ऊर्जा क्षेत्राचे सिंहावलोकन करीत असताना पुढील २०४७ अर्थात २५ वर्षाचे नियोजन केले जात आहे. पर्यावरण संतुलन साधून उर्जेची गरज भागविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अपारंपारिक ऊर्जेचा प्रवास गतिमानतेने सुरु असल्याबाबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी समाधान व्यक्त केले. अपारंपारिक उर्जा निर्मितीचे २०३० पर्यंतचे ५०० गिगावॅट उद्दिष्ट गाठण्यासाठी एकत्रितपणे काम करूया, असे आवाहन त्यांनी केले.



कोल्हापूर : उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य महोत्सव कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना जिल्हाधिकारी राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्यअभियंता परेश भागवत, अधीक्षक अभियंता अंकुर कावळे.

आजादी का अमृतमहोत्सवांतर्गत केंद्रीय ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल भारत- उज्ज्वल भविष्य महोत्सव सुरू आहे. राज्यात ऊर्जा मंत्रालय, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती व इतर भागिदार यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य शासनाच्या २५ ते ३० जुलै २०२२ या कालावधीत हा महोत्सव साजरा करण्यात येतो आहे. कोल्हापुरात भारतरत्न डॉ. एस. विश्वेश्वरय्या मेमोरियल हॉल येथे उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य महोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात झाला. आमदार जयश्री जाधव, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य अभियंता परेश भागवत, नोडल अधिकारी तथा अधीक्षक अभियंता अंकुर कावळे, अधीक्षक अभियंता मनोज विश्वासे, एनटीपीसी लि.चे डी. सुरेश, जि. के. विवेक यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

ऊर्जेचे महत्व अनन्य साधारण आहे. एडिसनने लावलेला विजेचा शोध ही सर्वात मोठी क्रांती असल्याचे मत श्री. चव्हाण यांनी व्यक्त केले.

महावितरणने केंद्र व राज्यसरकारच्या विविध योजनांची, ग्राहकाधिकार व कोल्हापूर महावितरणच्या महापूर कामांची माहिती देणारया डिजिटल फलकांची गॅलरी तयार केली होती. त्या गॅलरीचे प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. के.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूरचा उर्जेचे महत्व या विषयावर सांस्कृतिक कार्यक्रम व जनजागृती पथनाट्य व मूकनाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रारंभी नोडल अधिकारी तथा अधीक्षक अभियंता अंकुर कावळे यांनी प्रास्ताविक केले. आभार मुख्य कार्यकारी अधिकारी चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन उप कार्यकारी अभियंता मुकुंद आंबी यांनी केले. यावेळी पन्हाळा नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा मा. रूपालीताई धडेल, सरदार पाटील(सावर्डे) व सरदार व्हरांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.

### वीज डिजिटल युगाचा पाया - जिल्हाधिकारी

विजेच्या अविरतपणावर अर्थचक्राचा व नागरीकांचा सर्वांगिण विकास अवलंबून आहे. उद्योगांना अखंडीत वीज दिली पाहिजे.. देशाच्या विकासासाठी ऊर्जा क्षेत्राचा विकास महत्वाचा आहे. आज माहिती तंत्रज्ञानामुळे अवतरलेल्या डिजिटल युगास वीज ही. एक पायाभूत घटक असल्याचे मत जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी व्यक्त केले. विजेचे वीज बील वेळेत भरले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.